Lokmat

Printed from Lokmat epaper, Published on Monday, February 03, 2014, Lokmat Hello Pune Gramin Page No. 2

A A A << Back to Headlines Next >>

# पर्यावरण संवर्धन व संशोधकविषयक कार्यशाळा

जेजुरी : सिटी ऑफ द बर्ड्स कॉन्झर्वेशन अँण्ड रिसर्च आणि विश्वनिर्मल विद्यामंदिर जेजुरी यांच्या वतीने ग्रामीण भागातील मुलांमध्ये शास्त्रीय दृष्टिकोन, पर्यावरण संवर्धन व संशोधक वृत्ती निर्माण व्हावी यासाठी दोन दिवसांची कार्यशाळा यशस्वीरीत्या संपन्न झाली असल्याचे आयोजक सनी (चंद्रकांत) रेडिकन यांनी सांगितले.

जेजुरी येथील विश्वनिर्मल विद्यालयात पर्यावरणाचे संवर्धन व प्रत्यक्ष कृती संशोधनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी लोणी काळभोर, कोथळे, जिजामाता, पुण्यश्लोक व विश्वनिर्मलचे ५0 शिबिरार्थी सहभागी झाले होते. इंडियन इन्स्टिट्यूट सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च, आगरकर रिसर्च इन्स्टिट्यूट, आबासाहेब गरवारे कॉलेज, मॉडर्न कॉलेज पुणे, अहमदनगर व वाय. सी. कॉलेज सातारा येथील १५ तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना निसर्गातील सजीव प्रजातींचे निरीक्षण, संवर्धनाविषयी मार्गदर्शन करुन, कडेपठार डोंगर, होळकर तलाव व साकुर्डे परिसरातील पक्षी, प्राणी-कीटक आदी सजीव घटकांविषयी प्रत्यक्ष भेट देऊन माहिती दिली. विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती निर्माण व्हावी यासाठी निरीक्षणातून प्रकल्प करून घेतले.

डॉ. अविनाश वंजारे, डॉ. युगंधर शिंदे, तसेच पीएच.डी.चे विद्यार्थी- समीर पाध्ये, श्रुती पत्तेदार, सायली शेठ, निखिल मोडक, अबोली कुलकर्णी, सिद्धार्थ कुलकर्णी, सिद्धार्थ बिनीवाल,े अनिकेत मराठे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पर्यावरणविषयी ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये प्रेम निर्माण व्हावे. प्रत्यक्ष निरीक्षणातून मुलांमध्ये संशोधक वृत्ती निर्माण व्हावी यासाठी हा उपक्रम सतत राबविणार असल्याचे सनी रेडिकन यांनी सांगितले.

प्राचार्य पेट्रिक रेडिकन, प्रज्ञा रेडिकन, रेश्मा पानसरे, अर्चना लोखंडे आदींनी या कार्यशाळेचे नियोजन केले. जैविक विविधता नष्ट होत असून तिचे जतन करण्यासाठी तसेच पुरंदर तालुक्यात पर्यावरण संवर्धन प्रकल्प राबविण्यासाठी सातत्याने मार्गदर्शन करणार असल्याचे या वेळी डॉ. अविनाश वंजारे, डॉ. युगंधर शिंदे यांनी सांगितले.

कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी नगराध्यक्ष अविनाश भालेराव, नगरसेविका साधना दिडभाई, सुरेखा सोनवणे, ज्ञानेश्वरी बारभाई यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. (वार्ताहर)

---

<< Back to Headlines Next >> A A A